पुढारी बुधवार, ४ जानेवारी २०२३ ७

# अनेकान्तच्या मुलींचा हॉकी संघ राज्यस्तरीय स्पर्धेस पात्र

पुढारी ANCHOR

बारामती : पुढारी वृत्तसेवा

क्रीडा युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अहमदनगर व गौतम पब्लिक स्कूल, गौतमनगर-कोळपेवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या १४ वर्षांखालील पुणे विभागीय हॉकी स्पर्धेत येथील अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या अनेकान्त इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुलींच्या हॉकी संघाने प्रथम क्रमांक पटकावला. या संघाची राज्यस्तरीय स्पर्धासाठी निवड झाली.

पुणे विभागीय मुलांच्या हॉकी संघानेही तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे. अहमदनगर हॉकी संघाच्या उपांत्य सामन्यात आत्ममलिक स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स या संघाचा पराभव करीत मुलींच्या संघाने अंतिम फेरीत धडक मारली होती. अंतिम सामन्यामध्ये सेंट अन्नाज स्कूल, पुणे या संघाचा ३-० असा एकतर्फी गोल फरकाने पराभव करीत संघाने विजय प्राप्त केला. या स्पर्धेत पूर्वा जाधव, चैतन्या खोरे, समृद्धी हटाळे या विद्यार्थिनींनी गोल नोंदवीत व तनुश्री पोटे हिने उत्कृष्ट गोलरक्षण करीत संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. अकोला येथे होणाऱ्या १४ वर्षांखालील राज्यस्तरीय स्पर्धेसाठी या संघाची निवड झाली आहे. विजयी मुलींच्या संघाचे सर्वस्तरांतून कौतुक होत आहे. सर्व यशस्वी खेळाडूंना क्रीडाशिक्षक राहुल लोखंडे यांचे मार्गदर्शन मिळाले. या यशाबद्दल अनेकान्त शिक्षण संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह (वाघोलीकर), स्कूल कमिटीचे अध्यक्ष मिलिंद शाह (वाघोलीकर), व्यवस्थापक धवल शाह (वाघोलीकर), सर्व संचालक मंडळ, स्कूलच्या प्राचार्या राखी माथूर, समन्वयिका स्मिता ढवळीकर तसेच सर्व शिक्षकवृंद यांनी मुलींच्या हॉकी संघाचे विशेष कौतुक केले.



राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेला अनेकान्त इंग्लिश मीडियम स्कूलचा संघ.

Tuljaram Chaturchand College ★ Baramati ★ Library

दै. पुढारी दि. ०५/०१/२०२३ पान ६

# संशोधकांना भौतिक विज्ञानामध्ये भारतात विपुल संधी

## डॉ. पंडीत विद्यासागर; बारामतीत टी. सी. महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय परिषद

बारामती : पुढारी वृत्तसेवा

भौतिक विज्ञान हे मुलभूत शास्त्र असून, भारतामध्ये अजूनही विद्यार्थी, प्राध्यापक व खास करून संशोधकांना मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध आहे, असे मत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.पंडीत विद्यासागर यांनी व्यक्त केले.

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयामध्ये दि. ३ व ४ जानेवारी रोजी आयोजित मॉसेन्ट ट्रेण्डस इन मटेरीअल सायन्स-सिन्थेसिस, कैरैक्ट्राझेशन ॲण्ड ऐप्लिकेशन्सफया आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे सचिव मिलिंद शाह वाघोलीकर होते. याप्रसंगी शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी.एस.पाटील, सी-मेट पुणेचे संचालक डॉ.बी. बी. काळे, डॉ. एस. एच.पवार, उद्योजक धनंजय जामदार आदी मान्यवर उपस्थित होते.



तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी माजी कुलगुरू डॉ. पंडीत विद्यासागर यांचा सन्मान करण्यात आला.

भारत सरकारने आपल्या विज्ञान धोरणामध्ये खूप नवीन बदल अंगिकारलेले आहेत, त्यामुळे आंतरराष्ट्रीय दर्जाचे संशोधन विविध महाविद्यालये, विद्यापीठे व संशोधन प्रयोगशाळेमध्ये व्हायला हवे, असेही विद्यासागर यांनी सांगितले. महाविद्यालयाचे प्राचार्य चंद्रशेखर मुरूमकर यांनी विविध क्षेत्रांत महाविद्यालयाने केलेल्या प्रगतीचा आढावा घेतला. महाविद्यालयाने संशोधनासाठी व्यापक सुविधा निर्माण केल्या असून, विद्यार्थी व संशोधकांनी यांचा फायदा घ्यावा, असे आवाहन केले. पदार्थविज्ञान विभागप्रमुख डॉ. पांडुरंग पिंगळे यांनी आंतरराष्ट्रीय पदार्थविज्ञान परिषद आयोजनामागील भूमिका विशद केली.

यावेळी प्रमुख पाहुणे व मान्यवरांच्या हस्ते परिषदेच्या शोधनिबंधांचे सार-पुस्तिका तसेच डॉ.एस. एच. पवार यांनी संपादित केलेल्या मसिल्क: फायब्रिओन ॲडव्हान्सेस इन ॲप्लिकेशन्स ॲड रिसर्चफ (नोव्हा सायन्स पब्लिकेशन, अमेरिका) डॉ. आर. डी. माने यांनी लिहिलेल्या मॉडर्न ऑप्टिक्स शुभम प्रकाशन, कानपूर या पुस्तकांचे प्रकाशन झाले. परिषदेमध्ये देश-विदेशांतून ११७ संशोधक, शास्त्रज्ञ, प्राध्यापकांनी सहभाग घेतला असून, ८७ शोधनिबंधांचे वाचन झाले. तसेच पोस्टर प्रेझेन्टेशनही झाले. कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अविनाश जगताप, डॉ. रामचंद्र सपकाळ, डॉ. सीमा नाईक-गोसावी, डॉ.योगिनी मुळे, रजिस्ट्रार अभिनंदन शहा तसेच विभागप्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. परिषदेचे संयोजक सचिव डॉ. अशोक काळंगे यांनी आभार मानले.

दै. पुढारी ५/१/२३ पान ६

Tuljaram Chaturchand College Library ★ Baramati ★

पुढारी बुधवार, ४ जानेवारी २०२३ ७

# अनेकान्तच्या मुलींचा हॉकी संघ राज्यस्तरीय स्पर्धेस पात्र

पुढारी ANCHOR

बारामती : पुढारी वृत्तसेवा

क्रीडा युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अहमदनगर व गौतम पब्लिक स्कूल, गौतमनगर-कोळपेवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या १४ वर्षांखालील पुणे विभागीय हॉकी स्पर्धेत येथील अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या अनेकान्त इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुलींच्या हॉकी संघाने प्रथम क्रमांक पटकावला. या संघाची राज्यस्तरीय स्पर्धासाठी निवड झाली.

पुणे विभागीय मुलांच्या हॉकी संघानेही तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे. अहमदनगर हॉकी संघाच्या उपांत्य सामन्यात आत्ममलिक स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स या संघाचा पराभव करीत मुलींच्या संघाने अंतिम फेरीत धडक मारली होती. अंतिम सामन्यामध्ये सेंट अन्नाज स्कूल, पुणे या संघाचा ३-० असा एकतर्फी गोल फरकाने पराभव करीत संघाने विजय प्राप्त केला. या स्पर्धेत पूर्वा जाधव, चैतन्या खोरे, समृद्धी हटाळे या विद्यार्थिनींनी गोल नोंदवीत व तनुश्री पोटे हिने उत्कृष्ट गोलरक्षण करीत संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. अकोला येथे होणाऱ्या १४ वर्षांखालील राज्यस्तरीय स्पर्धेसाठी या संघाची निवड झाली आहे. विजयी मुलींच्या संघाचे सर्वस्तरांतून कौतुक होत आहे. सर्व यशस्वी खेळाडूंना क्रीडाशिक्षक राहुल लोखंडे यांचे मार्गदर्शन मिळाले. या यशाबद्दल अनेकान्त शिक्षण संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह (वाघोलीकर), स्कूल कमिटीचे अध्यक्ष मिलिंद शाह (वाघोलीकर), व्यवस्थापक धवल शाह (वाघोलीकर), सर्व संचालक मंडळ, स्कूलच्या प्राचार्या राखी माथूर, समन्वयिका स्मिता ढवळीकर तसेच सर्व शिक्षकवृंद यांनी मुलींच्या हॉकी संघाचे विशेष कौतुक केले.



राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेला अनेकान्त इंग्लिश मीडियम स्कूलचा संघ.

सकाळ | ५
पुणे, गुरुवार, ५ जानेवारी २०२३ बारामती विभाग

# अनेकान्त एज्युकेशन सोसायटी, बारामती

संस्था कार्यालयाचा पत्ता : प्रशासन भवन, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय आवार, बारामती, जि. पुणे.
मोबा. : ८६२४८१०६०६.

## निविदा सूचना

आमच्या अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती या आवारातील स.नं. २६९/अ/१ (पी)+ २७०/२+२७१ या ठिकाणी डी.एल.एस. या इमारतीच्या उर्वरित बांधकामाकरिता अनुभवी व योग्य त्या वर्गामध्ये नोंदणीप्राप्त कंत्राटदारांकडून बी-१ प्रकारामध्ये सीलबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | इमारतीचे क्षेत्रफळ | मजले | अंदाजे बांधकाम खर्च रु. | बयाणा रक्कम रुपये | सुरक्षा अनामत | कामाचा कालावधी | निविदा फी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ८६३९.९३ चौ.मी. | ग्राऊंड + पाच मजले RCC G + ३ पूर्ण आहेत. | १०,१३,००,०००/- (दहा कोटी तेरा लाख रुपये) | अंदाजपत्रकीय रकमेच्या १% | अंदाजपत्रकीय रक्कमेच्या ५% (रोख २% आणि बिलातून ३%) | ९ महिने | १०,०००/- रोख ना परतावा |

कोऱ्या निविदा संस्थेच्या कार्यालयातून दि. ६-१-२०२३ सकाळी ११.०० वा. पासून ते दि. १३-१-२०२३ सायं. ४.०० वाजेपर्यंत (सुटीसोडून) कार्यालयाच्या कालावधीत (स. ११.०० ते सायं. ५.०० वा. पर्यंत) उपलब्ध होतील. कोऱ्या निविदा घेण्यापूर्वी संस्थेच्या कार्यालयात निविदेच्या अटी व शर्ती पाहूनच कोरी निविदा खरेदी करावी. भरलेल्या निविदा दि. १४-१-२०२३ रोजी दुपारी ४.०० वा. पर्यंत स्वीकारल्या जातील. प्री-बीड मिटिंग १२-१-२०२३ दुपारी ४.०० वाजता आहे. दाखल झालेल्या निविदा दि. १६-१-२०२३ दुपारी ४.०० वा. कंत्राटदारांच्या समक्ष उघडल्या जातील. बयाणा रक्कम डी.डी. द्वारे **अनेकान्त एज्युकेशन सोसायटी अकौंट लोकल कमिटी** या नावे द्यावयाची आहे. कोणतीही अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता फेटाळण्याचा अधिकार अनेकान्त एज्युकेशन सोसायटीने राखून ठेवला आहे.

**आर्किटेक्ट**
मिलिंद पावसकर ॲण्ड असोसिएट्स, पुणे

**चेअरमन**
बांधकाम समिती

**सचिव**
अनेकान्त एज्युकेशन सोसायटी, बारामती

Tuljaram Chaturchand College
Library

दैनिक सकाळ दि.०७/०९/२०२३ पान नं.४

# राज्यस्तरीय हॉकी स्पर्धेसाठी 'अनेकान्त'च्या खेळाडूंची निवड

**बारामती, ता. ६ :** क्रीडा युवक सेवा संचलनालय तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अहमदनगर व गौतम पब्लिक स्कूल यांच्या वतीने घेण्यात आलेल्या १४ वर्षाखालील पुणे विभागीय हॉकी स्पर्धेत अनेकान्त इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुलींच्या हॉकी संघाने प्रथम क्रमांक पटकावला.

पुणे विभागीय मुलांच्या हॉकी संघानेही तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे. अहमदनगर हॉकी संघाच्या उपांत्य सामन्यात आत्ममलिक स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स या संघाचा पराभव करीत मुलींच्या संघाने अंतिम फेरीत धडक मारली होती. अंतिम सामन्यामध्ये सेंट अन्नाज स्कूल, पुणे या संघाचा तीन विरुद्ध शून्य अशा एकतर्फी गोल फरकाने पराभव करीत संघाने विजय प्राप्त केला.



**बारामती :** हॉकी स्पर्धेतील अनेकान्तचे यशस्वी खेळाडू.

या स्पर्धेत पूर्वा जाधव, चैतन्या खोरे, समृद्धी हटाळे या विद्यार्थिनींनी गोल नोंदवीत व तनुश्री पोटे हिने उत्कृष्ट गोलरक्षण करीत संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला.

अकोला येथे होणाऱ्या १४ वर्षाखालील राज्यस्तरीय स्पर्धेसाठी या संघाची निवड झाली आहे. सर्व यशस्वी खेळाडूंना क्रीडाशिक्षक राहुल लोखंडे यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर, स्कूल कमिटीचे अध्यक्ष मिलिंद वाघोलीकर, व्यवस्थापक धवल शहा वाघोलीकर, प्राचार्या राखी माथूर, समन्वयक स्मिता ढवळीकर यांनी संघातील खेळाडूंचे अभिनंदन केले.

सकाळ दि ७/९/२३ पान ४

Tuljaram Chaturchand College
Library
Baramati

दैनिक सकाळ दि. 07/01/2023 पान नं. ४



**बारामती :** रझिया पटेल यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर.

## टीसी महाविद्यालयात व्याख्यान

**बारामती :** "स्त्रिया जो पर्यंत वंचित आणि दुर्बल राहतील तो पर्यंत विकासाची प्रक्रीया सुरु होऊ शकत नाही," असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्त्या रझिया पटेल यांनी केले. तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात महिला सबलीकरण समितीतर्फे सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त पटेल यांचे स्त्री सक्षमीकरण या विषयावर व्याख्यान झाले. त्या प्रसंगी त्या बोलत होत्या. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. पटेल म्हणाल्या, "जगाच्या अर्थपातळीवर पोहोचलेल्या तीन टक्केच महिला आहेत. ज्या वंचित दुर्बल महिला आहेत. त्यांचा कार्यकारण भाव समजून घेतला पाहिजे. स्त्रियांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले पाहिजे. स्त्रियांना आग्रहाने निर्णय क्षमतेमध्ये प्राधान्य दिले पाहिजे." उपप्राचार्या डॉ. सीमा नाईक गोसावी अध्यक्षस्थानी होत्या. वैशाली पोळ यांनी परिचय करून दिला, स्मिता मंगुडकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रतिभा जावळे यांनी आभार मानले. संस्थेचे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर व सचिव मिलिंद वाघोलीकर यांनी मार्गदर्शन केले. सकाळ 7/1/23 पान ४

Tuljaram Chaturchand College
Library
Baramati

मा. प्राचार्य साहेब.

सकाळ ४ पुणे, शनिवार, ७ जानेवारी २०२३

## → अवतीभवती



**बारामती :** 'पुरुषोत्तम'मध्ये द्वितीय क्रमांक प्राप्त करणारी टी.सी. महाविद्यालयाची 'भू-भू' एकांकिकेची टीम मान्यवरांसोबत.

# टीसी महाविद्यालयाकडून 'भू-भू'च्या टीमचा सत्कार

**बारामती :** तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाने सादर केलेल्या भू-भू एकांकिकेस नुकतेच द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक व श्रीराम करंडक प्राप्त झाला. या यशाबद्दल भू-भू टीमचा सत्कार सोहळा महाविद्यालयात झाला. विजेत्या विद्यार्थ्यांसह प्रा. भीमराव तोरणे, प्रा. राजेंद्र कंडरे यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर, माजी नगराध्यक्षा पौर्णिमा तावरे, सचिव मिलिंद वाघोलीकर, विकास लेंगरेकर, विद्युत शहा, डॉ. जे. जे. शहा, सत्यजित पंदारकर, सोनिक पंदारकर, सुभाष ढोले उपस्थित होते. जवाहर वाघोलीकर यांनी मनोगतात या टीमचे कौतुक करतानाच बारामतीतील नाट्यक्षेत्राची माहिती दिली. पुरुषोत्तमच्या यशाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त करताना भविष्यातही अशीच कामगिरी व्हावी अशी अपेक्षा व्यक्त केली. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी प्रास्ताविकात पुरुषोत्तमचा इतिहास विशद करत विद्यार्थ्यांच्या तयारीची माहिती दिली. कुसुम वाघोलीकर यांनी यशस्वी विद्यार्थ्यांना पाच हजारांचे पारितोषिक देऊ केले. सूत्रसंचालन स्मिता मंगुडकर व सुषमा संगई यांनी केले.

Tuljaram Chaturchand College Library Baramati

AB 1513

मा. प्राचार्य साहेब

दैनिक सकाळ दि. ९/०९/२०२३ पान नं. ६ (पुणे जिल्हा)

# संशोधन समाजोपयोगी व्हावे : डॉ. पाटील

**बारामती, ता. ८ :** 'संशोधकांनी केलेल्या संशोधनामुळे समाजाला नवीन दिशा व उपयुक्त माहिती मिळायला हवी, व्यावसायिकदृष्ट्या त्याचा उपयोग करता यायला हवा आणि अशा दर्जाचे संशोधन या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील संशोधकांद्वारे निश्चितच होईल, असा मला ठाम विश्वास वाटतो,' असे प्रतिपादन संजय घोडावत विद्यापीठ, कोल्हापूरचे कुलगुरू व प्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. अरुण पाटील यांनी केले. तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयामध्ये आयोजित केलेल्या 'रिसेंट ट्रेंड्स इन मटेरिअल सायन्स' आंतरराष्ट्रीय परिषदेच्या समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. पाटील बोलत होते.



**बारामती :** कुलगुरू डॉ. अरुण पाटील यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर.

अध्यक्षस्थानी अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त विकास शहा लेंगरेकर होते. ते म्हणाले की, कोणतेही संशोधन हे प्रबंधातील पानांवरच न राहता त्याचा प्रत्यक्ष वापर करता यायला हवा. महाविद्यालयाने आयोजित केलेल्या या आंतरराष्ट्रीय परिषदेमुळे विद्यार्थी व संशोधकांना जागतिक स्तरांवर संशोधनामध्ये कोणत्या घडामोडी, बदल होत आहेत, याचे आकलन होण्यास मदत होईल.

या परिषदेमध्ये भारतासह विविध देशांतील ११७ संशोधकांनी सहभाग घेतला. संशोधन पारितोषिक विजेते (प्रथम, द्वितीय व तृतीय या क्रमाने) : पोस्टर प्रेझेन्टेशन - गिरिजा महामुनी, मुंबई विद्यापीठ. श्रेयस भोंजाळ, आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे. दिव्या साळुंके, टी. सी. कॉलेज, बारामती. ओरल प्रेझेंटेशन डॉ. धनाजी दळवी, कृष्णा महाविद्यालय, रेठरे. एस. एम. नायक, टी. सी. कॉलेज, बारामती, डॉ. श्रीमंत खाडे, विश्वचैतन्य आयुर्वेदिक रसशाळा, बारामती. उपस्थितांचे स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी केले. आढावा डॉ. अशोक काळंगे यांनी घेतला. पारितोषिकांचे वाचन डॉ. आर. टी. माने यांनी केले. उपप्राचार्य डॉ. रामचंद्र सपकाळ यांनी आभार मानले. डॉ. सुशील देशमुख यांनी सूत्रसंचालन केले. परिषदेच्या आयोजनामध्ये संस्थेचे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर, सचिव मिलिंद वाघोलीकर यांनी मार्गदर्शन केले.

सकाळ ९/०९/२०२३ पान ६ (पुणे जिल्हा)

Tuljaram Chaturchand College Library Baramati

दैनिक : पुढारी दि. ११/09/2023 पान नं. ६.

# जागतिक दर्जाचे संशोधन व्हावे : कुलगुरू

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

समाजाला उपयुक्त व व्यावसायिकदृष्ट्या वापरता येण्याजोगे जागतिक दर्जाचे संशोधन व्हायला हवे. तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील संशोधकांद्वारे ते निश्चितच होईल, असा मला ठाम विश्वास वाटतो, असे प्रतिपादन संजय घोडावत विद्यापीठ, कोल्हापूरचे कुलगुरू डॉ. अरुण पाटील यांनी केले.



आंतरराष्ट्रीय परिषदेच्या समारोपप्रसंगी कुलगुरु डॉ. अरुण पाटील यांचा सत्कार केला.

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात आयोजित रिसेंट ट्रेंड्स इन मटेरिअल सायन्सविषयक आंतरराष्ट्रीय परिषदेच्या समारोपात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. पाटील बोलत होते. समारंभाच्या अध्यक्षस्थानी अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे ज्येष्ठ विश्वस्त विकास शहा लेंगरेकर होते. डॉ. पाटील म्हणाले की, महाविद्यालयाने आयोजित केलेल्या या आंतरराष्ट्रीय परिषदेमुळे विद्यार्थी व संशोधकांना जागतिकस्तरावर संशोधनात कोणकोणत्या घडामोडी, बदल होत आहेत याचे आकलन होण्यास मदत होईल. अध्यक्षीय भाषणात विकास शहा लेंगरेकर यांनी आंतरराष्ट्रीय परिषदेत सहभाग घेतलेल्या व पारितोषिक विजेत्या विद्यार्थी, प्राध्यापक व संशोधकांना शुभेच्छा दिल्या. प्रमुख संशोधन केंद्र म्हणून तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय नावलौकिक प्राप्त करेल, असा विश्वास व्यक्त केला.

परिषदेत भारतासह विविध देशांतील मिळून ११७ संशोधकांनी सहभाग घेतला. संशोधन पारितोषिक विजेते पोस्टर प्रेझेन्टेशन प्रथम क्रमांक गिरीजा महामुनी (मुंबई विद्यापीठ), द्वितीय - श्रेयस भोंजाळ (आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे), तिसरा क्रमांक टी. सी. महाविद्यालय बारामतीच्या दिव्या साळुंके यांना मिळाला. ओरल प्रेझेंटेशनमध्ये प्रथम क्रमांक डॉ.धनाजी दळवी (कृष्णा महाविद्यालय, रेठरे), दुसरा क्रमांक एस. एम. नायक (टी. सी. कॉलेज, बारामती) तर तिसरा क्रमांक डॉ. श्रीमंत खाडे (विश्वचैतन्य आयुर्वेदिक रसशाळा, बारामती) यांना मिळाला.

प्रारंभी प्रमुख पाहुणे व मान्यवरांचे स्वागत प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरूमकर यांनी केले. दोन दिवसीय परिषदेचा सविस्तर आढावा परिषदेचे संयोजन सचिव डॉ. अशोक काळंगे यांनी घेतला. पारितोषिकांचे वाचन डॉ. आर. टी. माने यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. सुशील देशमुख यांनी केले. उपप्राचार्य डॉ. रामचंद्र सपकाळ यांनी आभार मानले. आयोजनामध्ये संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर, सचिव मिलिंद शाह वाघोलीकर यांचे मार्गदर्शन लाभले.

दै. पुढारी दि. ११/09/2023 पान नं. ६.

Tuljaram Chaturchand College ★ Baramati ★ Library